# योजना

**योजनेचे नाव :- जिल्हा निधी योजना सन 2024 -25 करीता भाजीपाला बियाण्यावर अनुदान देणे या योजने अंतर्गत 90% अनुदानावर भाजीपाला बियाणे किट पुरवठा करणे बाबत.**

**तरतुद :- रुपये 3.00 (अक्षरी रुपये तीन लक्ष)**

**योजनेचे उददेश**

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी व दुर्गम असुन जिल्हयात प्रामुख्याने भाताचे पिक घेतले जाते. मागील 10 ते 15 वर्षाच्या भातपिकाचे उत्पन्नाबाबत आढावा घेतला असता असे दिसुन येते की, दर 2 ते 3 वर्षानंतर दुष्काळ परिस्थिती निर्माण होऊन शेतकरी आर्थिक दृष्टया कमकुवत झालेला आहे.या करीता जिल्हयात खरीप व रब्बी हंगामात भात पिका व्यतिरिक्त अधिक उत्पन्न देणा-या व शेतक-यांना आर्थिक फायदा मिळवुन देणारे भाजीपाल्याचे पिक शेतक-यांनी घेतल्यास भाजीपाला पिकाचे क्षेत्र वाढुन अनु.जाती अनु. जमाती अल्प व अत्यल्प भुधारक शेतक-यांचे आर्थिक उत्पादनात वाढ करणे शक्य आहे. तसेच गडचिरोली सारखा आदिवासी बहुल जिल्हयात कुपोषणाचे प्रमाण अधिक असल्याने फळभाज्या /भाजीपाला उत्पादनाव्दारे त्यांच्या कुपोषनावर मात करता येणे शक्य आहे. भाजीपाला बियाणे 90% अनुदानावर वाटप करणे योजनेचा हा मुख्य उददेश आहे.

**योजनेच्या कार्यपद्धती :-**

जिल्हा निधी योजना सन 2024 -25 या वर्षात /राष्ट्रीय बिज निगम नागपूर किंवा महाराष्ट्र,राज्य बियाणे महामंडळ चंद्रपूर मार्फतीने पंचायत समितीस बियाणे पुरवठा करण्यात येईल.पुरवठा झालेले बियाणे विक्री करतांना सुटीची रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम शेतक-यांकडुन रोखीने घेण्यात यावी. या योजने वरील खर्च जिल्हा निधी योजना सन 2024 -25 **भाजीपाला बियाणे 90%अनुदान देणे** या लेखाशिर्ष खाली खर्ची टाकण्यात यावा पंचायत समिती मार्फत वाटप बियाणे दरवर्षी प्रमाणे कार्यवाही करुन लेखा परिक्षणासाठी आवश्यक दस्ता ऐवज जतन करुन ठेवण्यात येईल पर्यवेक्षीय अधिका-यांनी वेळोवेळी भेटी देवुन आढावा घ्यावा व शिफारशी करण्यात याव्यात. शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास त्यानुसार समाधान झाल्याचे फलश्रुती अहवाल कृषि विभागास सादर करावे. झालेल्या खर्चाचे नमुना 14 व उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी सादर करावे.

**योजनेचा अटी व शर्ती :-**

1) राष्ट्रीय बिज निगम**नागपूर** किंवा महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ **चंद्रपूर** मार्फतीने पुरवठा होणा-या भाजीपाला बियाण्यावरच अनुदान देय राहील.
2) सदर योजनेचा लाभ अनु.जाती /जमाती /अल्प /अत्यल्प भुधारक/विमुक्त/भटक्याजाती/जमाती मागासवर्गीय शेतक-यांना 90 % अनुदानावर प्रथम प्राधन्याने देय राहील.
3) अनुदान वजा जाता 10 % लाभार्थी सहभाग भाजीपाला बियाणे किट वाटपा पुर्वी वसुल करुन धनादेशाव्दारे त्वरीत पुरवठा संस्था यंत्रणेला पाठवावा व या कार्यालयास अवगत करावे व वितरण अहवाल या कार्यालयास सादर करावे.
4) प्राप्त साठयाची नोंद **साठा पंजीत** ठेवण्यात यावी.
5) एका शेतक-यास एक किट साठीच अनुदान देय आहे.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली